
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५६ वे, अंक १०वा, मुंबई । डिसेंबर २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 10, Mumbai I December 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## ।। श्री ज्ञानेश्वर माऊली ।।



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक १०वा,
डिसेंबर २०२३
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली
## स्नेहसंमेलन - २०२३











**संमेलनाध्यक्ष श्री. मुकुंदराव कलकर्णी यांच्या हस्ते**
**श्री. रामचंद्र परशुराम दिगवडेकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान**


FE
INDIA'S BEST BANKS AWARDS
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
IndusInd Bank
THE ULTIMATE
SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF*
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE*
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.



HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving 75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# कार्याध्यक्षांचे मनोगत

## प्रभाकर कुलकर्णी

२०१० सालापासून आजपर्यंत मी संस्थेचा माझ्या कुवतीनुसार सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. २०१३ ते २०१८ पर्यंत मी तेव्हांच्या कार्यकारी मंडळात निमंत्रीत सदस्य म्हणून काम करीत होतो. त्यानंतर २०१८ साली कै. ॲड्. माधवराव अनगळ साहेब यांच्या विनंतीनुसार कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत आहे.

२०१३ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड कधी मुंबईत येऊन प्रत्यक्ष मतदानाने, कधी टपालाद्वारे मतदान, कधी संगणक प्रणालीनुसार मतदान अशाप्रकारे घेण्यात येत होती. यामध्ये मुंबई बाहेरील जे आपले पाच हजार सभासद आहेत त्यांना फार कमी प्रमाणात मतदानात भाग घेऊन स्वतःच्या पसंतीचे कार्यकारिणी सदस्य निवडण्याचा अधिकार प्राप्त होत नव्हता. २०१२-१३ साली सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या न्याय निर्णयानुसार आपले आवडते परंतू आता कैलासवासी झालेले ॲड्. माधवराव अनगळ यांच्या अध्यक्षतेखाली ९ जणांची कार्यकारिणी नेमण्यात आली. या कार्यकारिणीने अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन संस्थेचे कार्य पुनःश्च गतवैभवात आणण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. त्यातील मुख्य क्रांतिकारी निर्णय म्हणजे (१) भाडेकरू राहत असलेल्या जागा ताब्यात घेण्यासाठी भाडेकरु विरुद्ध लघुवाद न्यायालयात दावे दाखल करून त्या जागा संस्थेच्या उद्दीष्ट पुर्तीसाठी ताब्यात घेण्यासाठी न्यायालयीन कारवाई सुरु केली. आपल्यालाच माहितच आहे की आपण ३० दाव्यांपैकी ८ दाव्यांमध्ये आपल्या बाजून निकाल लागून ८ जागा आपण संस्थेच्या ताब्यात घेतल्या आहेत. (२) २००८-०९ पासून विस्कटलेली आर्थिक स्थिती व जमा-खर्च व हिशोब हे लिहून घेऊन संस्थेची आर्थिक स्थिती रुळावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. (३) दोन्ही सभागृह असलेली ईमारतीची योग्य ती आवश्यक दुरुस्ती करून तळमजल्यावरील सभागृह व रंगमंच सुशोभित करून संस्थेचे उत्पन्न वाढविण्यास मदत केली आहे. (४) धर्मादाय आयुक्तांकडून नवीन निवडणूक नियमावली मंजूर करून घेण्यात आली. ज्यामध्ये मागील सर्व तुटी व गैरप्रकार कसे टाळता येतील अशा प्रयत्न करण्यात आला आहे. जेणेकरून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व्हावी व संस्थेच्या प्रत्येक सभासदाला त्याचा आवडता प्रतिनिधी निवडून देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

आपण सर्व सभासद बंधु-भगिनींनी, संलग्न संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मला व माझ्या कार्यकारिणीतील सहकाऱ्यांना अमाप सहाय्य, मार्गदर्शन केले असून आमच्यावर जो विश्वास आपण प्रकट केला आहे. त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा मनापासून आभारी आहे. आम्ही व माझ्या सहकाऱ्यांनी आपली ८३ वर्षे जुनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ संस्था पुनःश्च सुस्थितीत आणण्याचे काम केले असून ती आता योग्य भरारी घेण्याच्या परिस्थितीत आहे. संस्थेचे उत्पन्न रु. ५० लाखाच्यावर झाले असून भविष्यात अनेक समाजोपयोगी उपक्रम संस्था राबवू शकते. जेणेकरून सर्वसामान्य सभासदांना त्याचा लाभ मिळेल. ३० सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या सर्वसधारण सभेमध्ये लवकरच नवीन कार्यकारिणी अस्तित्वात यावी असे ठरले आहे. बहुसंख्य सभासदांनी तसेच संलग्न संस्थांनी सभेमध्ये असे सुचविले आहे की, सभासदांच्या लोकशाही हक्काला बाधा न आणता यापुढे अस्तित्वात येणारी कार्यकारिणी आपण सर्वानुमते कुठल्याही प्रकारची निवडणुक न घेता निवडु या जेणेकरून आपल्याला संस्थेचे निवडणूकीपोटी होणारी रुपये १.५ ते २ लाख खर्च वाचविता येईल. मी स्वतः व आम्ही सर्व कार्यकारिणी सदस्य या मताशी संपूर्णपणे सहमत आहोत व यासंबंधी गेल्या माझ्या संस्थेतील अनुभवानंतर नवीन कार्यकारिणी निवडण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्त्वे आपल्या सर्वांच्या विचारार्थ प्रस्तुत करीत आहे.

१) मुंबई बाहेरील जे सदस्य कार्यकारिणीवर निवडून येतील त्यांनी मध्यवर्ती मंडळाचे त्यांच्या विभागात कार्य वाढविण्याची त्यांची इच्छाशक्ती असावी व तशी त्यांची संस्थेसाठी वेळ देण्याची तयारी असावी व यासाठी ज्यांना खरोखरच सामाजिक कार्याची आवड असेल व समाजाबरोबर प्रेम असेल अशा व्यक्तींनी त्यांची इच्छा स्थानिक संस्थांचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि मध्यवर्ती मंडळाकडे लेखी कळवावे.

२) शक्योतोवर एकाच कुटुंबातील एकच व्यक्ती कार्यकारिणी सदस्य म्हणून काम करावे.

३) व्यक्ती स्तोमापेक्षा कार्य स्तोम महत्त्वाचे असावे व शक्यतोवर राव, पंत, साहेब यांचा उदोउदो न करता प्रत्येक कार्यकर्त्याच्या सामाजिक बांधिलकेची नोंद घेऊन त्याची कार्यकारिणीवर नेमणूक व्हावी.

४) जो स्थानिक इच्छुक कार्यकारिणी सदस्य असेल त्यांनी मध्यवर्ती मंडळाचे व संलग्न संस्थांचे कार्य कसे वाढेल व जास्तीत जास्त सभासदांपर्यंत आपण कसे पोहोचू व त्यांच्या समस्यांचे निराकरण कसे करू, हा विचार ध्यानात ठेवावा.

मागच्या निवडणूकीमध्ये जरी आपण मुंबई बाहेरील सदस्यांना पदाधिकारी म्हणून नेमणूक केली होती तरी फारच कमी पदाधिकारी संस्थेच्या कार्यात मुंबईत येऊन कार्य करु शकले याची कारणे अनेक असु शकतात व ती क्वचित त्यांच्यापरीने योग्यही असतील परंतु भविष्यात जे मुंबई बाहेरील पदाधिकारी मध्यवर्ती मंडळाचे काम करु इच्छितात त्यांनी मुंबईत आवश्यक असेल त्यावेळी येऊन काम करण्याची इच्छा प्रदर्शित करावी. माझे हे वरील विचार वैयक्तिक अनुभवावर आधारीत असून त्याचा स्विकार व्हावा अशी माझी बिलकूल इच्छा नाही परंतू माझ्या सुचनेचा विचार केल्यास मला विश्वास आहे की, आपल्या संस्थेचा भविष्यकाल उज्वल आहे आणि समाजातील खरोखरच दुर्लक्षितांना त्याचा आपण लाभ देऊ शकू. माझी अशी विनंती आहे की, प्रत्येक विभागामध्ये संलग्न संस्थांच्या अध्यक्ष, कार्याध्यक्षांनी एक सभा बोलावून स्थानिक स्तरावर अशा योग्य व्यक्तींची निवड केल्यास आपला निवडणूकीचा खर्च वाचविता येईल व योग्य व्यक्तिंना समाजाची नेतृत्व करण्याची संधी मिळेल. आणखी आग्रहाची विनंती की, शक्यतोवर २० ते २५ टक्के तरुण रक्ताला व ३० टक्के महिलांना प्रातिनिधित्व दिल्यास संस्थेचा भविष्यकाल उज्वल असेल.

कळावे, लोभ आहेच तो वृद्धिंगत व्हावा!

## संलग्न संस्था वृत्त

**धुळे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे तर्फे नुकतेच गरुड प्रायमरी स्कूल, ओढेकर उद्यान येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सद्‌गुरु पद्मनाभ स्वामी महाराज संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य हभप श्री भाऊ महाराज रुद्र होते. तसेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे चे अध्यक्ष सी.ए. राजाराम कुलकर्णी, अ‍ॅड्. गिरीष ओढेकर, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. रेणुका पेटारे व्यासपीठावर उपस्थित होत्या. प्रारंभी कु. निलश्री कुलकर्णी यांच्या स्वागगीतानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व समर्थ रामदास स्वामी, संत एकनाथ व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्याध्यक्ष विलास क्षीरे यांनी गतकाळातील कार्यक्रमांचा संक्षिप्त आढावा घेतला. अध्यक्ष श्री. राजाराम कुलकर्णी यांनी ज्ञातीबांधवांनी सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन ऐक्य अबाधीत ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहण्यासाठी आवाहन केले. संगीताचार्य प्रा. डॉ. शेखर श्रीराम रुद्र यांच्या स्वरसंवाद ग्रुपने सादर केलेल्या सुंदर संगीत मैफलीने सर्वांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात जेष्ठ पुरोहित श्री. रमेश कुलकर्णी गुरुजी, शब्दसाधना परिवाराचे रविंद्र (राजाभाऊ) कुलकर्णी, साहित्यिका प्रभा बैकर, संगीताचार्य प्रा. डॉ. शेखर रुद्र, संगीत

अलंकार, सौ. किर्ती रुद्र, सौ. भावना कुलकर्णी, दिनेश रुद्र, किर्तनकार संजीव कुलकर्णी, मा. राज्यपाल नियुक्त उमवि विद्या परिषद सदस्य सीए राजाराम कुलकर्णी, शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल आनंद कुलकर्णी, ॲड. गिरीश ओढेकर, जेष्ठ दंत शल्य चिकित्सक डॉ. सुनील कोरान्ने, उद्योजक सागर देशपांडे, उद्योजक राहुल कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. प्रा. पंकज अडावदकर यांनी सूत्रसंचालन केले व उपाध्यक्ष आनंद कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेच्या शताब्दीस प्रारंभ – चतुर्वेद मंत्रजागराने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या शताब्दी वर्षास दिवाळी पाडव्याला प्रारंभ झाला. ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी स्थापन झालेली ही संस्था यंदा शताब्दी साजरी करीत आहे. दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर २९ ऑक्टोबर १९१४ रोजी दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर या संस्थेची स्थापना झाली. या निमित्ताने यंदा दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर या संस्थेची स्थापना झाली. या निमित्ताने यंदा दिवाळी पाडव्याला एकनाथ मंगल कार्यालय येथे चतुर्वेद मंत्रजागराने शताब्दी वर्षाचा प्रारंभ करण्यात आला. राहुल चिंतामण जोशी यांच्या नेतृत्वाखाली ऋग्वेद, कृष्ण यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यामधील मंत्रजागर करण्यात आले. वेदमूर्ती माधव परांजपे, अथर्व पटवर्धन, मनीष पटवर्धन, सुशील पाटील, समीर मिराशी, सिद्धांत जोशी, मंदार क्षीरसागर यांनी ऋग्वेदाचा मंत्रजागर केला. विलास दीक्षित, मयुरेश डबीर यांनी कृष्ण यजुर्वेद, कृतार्थ असनीकर, रोहन बैरागी यांनी सामवेद आणि गणेश गोलेगावकर, रघुनाथ कुळकर्णी यांनी अथर्ववेद मंत्र सादर केले. मंत्रजागरातील सहभागी ब्रह्मवृंदाचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी, विश्वस्त चिटणीस सुनील पारखी आणि अन्य विश्वस्तांच्या हस्ते झाला.

**मुलुंड** : रविवार दि. १२ नोव्हेंबर रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड च्या सभागृहामध्ये श्री. व सौ. वडगबाळकर यांच्या हस्ते श्री लक्ष्मी ची पूजा संपन्न झाली. गुरुजी श्री. प्रकाश लोणकर यांनी पूजा सांगितली. त्यानंतर श्रीसुक्ताचे सामूहिक पठण करुन श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या पंधराव्या अध्यायाचे पठण याप्रसंगी झाले. उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. याच कार्यक्रमात सौ. आरती कुलकर्णी यांनी मिल्लेट.. तृणधान्य कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. सौ. अरुणा आग्नहोत्री यांनी तृणधान्य रांगोळी स्पर्धेबद्दल माहिती दिली. श्री. बडकबाळकर यांनी तृणधान्याचे महत्त्व विशद केले. अशातऱ्हेने उत्तम उपस्थितीत लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

**मुंबई** : * रविवार दि. १२ नोव्हेंबर रोजी दादर येथील मध्यवर्ती संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग येथील सभागृहात श्री लक्ष्मी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके, व्यवस्थापक श्री. विकास माने आणि दादर येथील सभासद उपस्थित होते. संस्थेचे सभागृह उत्कृष्ठ रांगोळीने सजविलेले होते. दिवाळी फराळाने कार्यक्रमाची सांगता झाली.

* अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाने मुंबई स्थित सभासदांसाठीचा मेळावा तसेच दिवाळी निमित्त स्वरमयी मेजवानीचे आयोजन दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके, कार्यवाह श्री. मिलिंद सरदेशमुख हे उपस्थित होते. सुमारे १०० ते १२५ सभासदांनी या सोहळ्यचा आनंद घेतला. षड्ज पंचम प्रस्तुत गंधार या स्वरमयी जुन्या मराठी व हिंदी गितांचा बहारदार कार्यक्रम संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे निवेदन श्री. हेमंत बर्वे यांनी केले होते. या कार्यक्रमात गायक 'झी सारेगम' फायनलिस्ट पल्लवी केळकर, 'गौरव महाराष्ट्राचा' फायनलिस्ट निलेश निरगुडकर, स्वर : पार्श्वगायिका

मानसी फडके इ. चा सहभाग होता. या बहारदार कार्यक्रमानंतर संस्थेचे जेष्ठ, श्रेष्ठ सभासद श्री. शरदचंद्र झरेगावकर, श्री. रविंद्र अवटी, श्री. जयप्रकाश देशपांडे, डॉ. श्री. लक्ष्मीकांत दाणी, श्री. शशि व्यास, सौ. ऋता कळमणकर आदि मानवरांचा संस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री. विलास जोशी व कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संस्थेचे जास्तीत जास्त सभासद व्हावेत आणि संस्थेचा विकास आणि प्रगती साधण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. ज्ञातीच्या हितासाठी अधिकाधिक निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठीचे प्रयत्न अविरत व्हावे असे मत संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे व्यवस्थापक श्री. विकास माने आणि इतरही कर्मचारी वर्गाने मोलाची मदत केली. सकाळी दिवाळीचा फराळ आणि भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**विलेपार्ले** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले संस्थेच्या कार्यकारी सदस्य श्रीमती मंदा श्रीकांत खेडेकर यांचे स्मृतीपित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. सचिन व श्री. सुजीत खेडेकर यांनी रु. एक लाख पंचवीस हजार देणगीचा धनादेश विलेपार्ले संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. लक्ष्मीकांत दाणी, कार्यवाह श्री. विनय केकतपुरे यांच्याकडे त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच ८ ऑक्टोबर २०२३ रोजी सुपुर्द केला. संस्थेच्यावतीने श्री. खेडेकर कुटुंबियांचे आभार मानण्यात आले. श्रीमती मंदाताई खेडेकर यांच्या निधनाने समाजाविषयी आणि संस्थेच्या वाटचालीत फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. श्रीमती मंदाताईंचे सामाजिक काम चिरंतर स्मरणात राहील, असे मत संस्थेचे कार्यवाह श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

**बेळगाव** : 'समर्थ'मुळे शेकडो व्यापारी, उद्योजकांना मदत - बेळगावातील व्यवसायिकांना अर्थसहाय्य करून समर्थ सोसायटीने गत २८ वर्षात कौतुस्कापद कामगिरी केली आहे. यामुळे अनेकांची प्रगती साधली असून शेकडो व्यापारी व उद्योजक घडले आहेत, असे प्रतिपादन येळ्ळूर ग्राम पंचायतीचे उपाध्यक्ष व बांधकाम व्यावसायिक प्रमोद पाटील यांनी व्यक्त केले.

येथील समर्थ को-ऑप. सोसायटीने २७ वर्षे पूर्ण करून २८ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त सोसायटीच्या मुख्य शाखेत शनिवारी आयोजित कार्यक्रमप्रसंगी पाहुणे म्हणून ते बोलत होते. त्यांच्या हस्ते समर्थ रामदासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

चेअरमन ॲड्. अजय सुनाळकर म्हणाले की, संचालक, कर्मचारी वर्ग यांनी अथक परिश्रम घेतल्यामुळे सोसायटीने यशस्वी वाटचाल केली आहे. संस्थेकडे २०० कोटींच्या ठेवी असून १८० कोटींची कर्जे वितरित केली आहेत. वार्षिक उलाढाल ८३८ कोटींची असून खेळते भांडवल २३० कोटी रुपयांचे आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या सहकार्याने वर्षभरात सामूहिक मुंजीचा कार्यक्रम, सभासदांच्या पाल्यांचा गौरव, कोजागिरी पौर्णिमा, वैद्यकीय शिबिरांचे आयोजन केले जाते.

यावेळी संचालक गणपत कुलकर्णी, विनायक जोशी, अरविंद कुलकर्णी, प्रदीपकुमार कुलकर्णी यांच्यासह सचिव राघवेंद्र केसनूर, सदानंद गोवनकोप व पायोनियर बँकेचे संचालक अनंत लाड उपस्थित होते. सोसायटीचे उपाध्यक्ष अभय जोशी यांनी आभार मानले.

**आपल्या अनुभवांचे संचित पुढच्या पिढीला मार्गदर्शक असते. ते शब्दसुमनांत गुंफा आणि पुस्तकरूपाने प्रसिद्ध होऊ द्या. आम्ही या वाटचालीत हस्तलिखित ते पुस्तक रूप देण्यास सज्ज आहोत.**

**संपर्क : अतुल जोशी, मो. : ९८२०१७८३४२, ७०२१४४०७१५**

# अध्यात्मिक जीवनाची सुरुवात

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

अध्यात्मिक जीवन असे जेंव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर एक ठराविक चौकटबद्ध असे विचार येत असतात. आपल्या आयुष्यातील उतारवयात जेव्हा आपल्या बऱ्याच इंद्रियांची क्षमता कमी झालेली असते तेव्हा आपण अध्यात्म व देवधर्म यांच्याबाबत सजग होऊन आपला शोध सुरु करतो. अनेकजण याला अध्यात्मिक जीवन म्हणतात. आधीच आपल्या इंदियांच्या क्षमता खूपच मर्यादित असतात त्यातही आपण वयाच्या साठी नंतर हे अध्यात्म जाणून घेण्याचा प्रयत्न करत असतो. तुम्हाला वाटतं का हे शक्य आहे? अध्यात्म जाणून घेणे किंवा ते जगणे इतके सोपे असेल का? आपण शाब्दिक व्याख्यांच्या अवतीभवती फार फिरतो पण क्वचित वेळाच आपल्याला त्या शब्दांचा अर्थ खऱ्या अर्थाने समजला असे होते.आता दुसरे उदाहरण त्या काहीजणांचे ज्यांना अध्यात्मिक जीवन म्हणजे बाह्यरूप बदलणे असे वाटत असते. भगवे वस्त्र धारण करुन किंवा काही प्रतीके जमा करुन आपण काही ठराविक दैनंदिन गोष्टी करत असू तर आपले जीवन अध्यात्मिक आहे असे आपणास म्हणता येईल का? अध्यात्मिक जीवन ही एक अनुभूती आहे त्याचे वर्णन करणे अशक्य आहे कारण कुठल्याही अनुभवाप्रमाणे ते नाही. ती एखादी कृती अथवा एखादा ठराविक टप्पा नाही. अध्यात्मिक जीवनाबद्दल बोलताना आपण नेहमी असे म्हणतो की आपण परब्रह्माशी आपल्याला जोडलं पाहिजे आणि एका टप्प्यावर आपणच त्या परब्रह्मतत्वात आहोत, आपण कोणी वेगळे नाहीत मी व परब्रह्म एकच आहेत हे जाणवलं पाहिजे. अशा पद्धतीचे विवेचन आपण ऐकत असतो.

आत्मा ही महत्त्वाची संज्ञा आहे आणि ती दिसत नाही फक्त अनुभवता येते. खरेतर आत्म्याच्या प्रभावाने झालेल्या कृती आपण पाहू शकतो किंवा त्याच्या अनुपस्थितीमुळे काय होते हे आपल्याला पाहता येते प्रत्यक्ष आत्मा अनुभवता येत नाही कारण तो इंद्रियांच्या पलीकडे आहे. आपण जसे शब्द बोलतो, लिहितो पण त्या शब्दात जो आत्मा असतो तो आपल्याला दाखवता येत नाही. आपल्याला आपली आवडीची प्रिय व्यक्ती खूप दिवसांनी भेटल्यावर आपण त्यांच्याशी भेटतो, मिठी मारतो, त्यांच्याशी बोलतो, त्यांची काळजी घेतो पण त्या भेटीतला आत्मा आपण दाखवू शकत नाही तसेच शब्दातील आत्मा आपण दाखवू शकत नाही. खरे पाहता एका तत्त्वानुसार अनेक गोष्टी होत असतात त्यावेळी आपल्याला होणाऱ्या दृश्य गोष्टी पाहता येतात पण त्यामागील तत्व दाखवता येत नाही. तसेच या सृष्टीचेही असते.एका साध्या उदाहरणाने आपण पाहू. आपण माठ विकत आणतो, कुंडी विकत आणतो विविध वस्तू विकत आणतो. माठ जर आपण सूक्ष्म पातळीवर पाहिला तर तो मातीचाच एक विशिष्ट आकार आहे आणि कुंडी हाही एक विशिष्ट आकारच आहे तर तसे पाहता माठ आणि कुंडी यांचे अस्तित्व नावापुरते आहे त्यात तत्व हे मातीच आहे. पुढे जाऊन जर आपण मातीचे सुक्ष्मदर्शकाच्या खाली निरीक्षण केले तर आणखी छोटे कण दिसतील आणि माती ही सुद्धा अनेक गोष्टीची मिळून तयार झालेली आहे असे समजेल म्हणजे माती हेही काही सत्य नसून त्यामागे वेगळ्याच तत्व आहेत. असे करत जात राहिलो तर आपल्या असे लक्षात येईल की वेगवेगळ्या रंग, रुप व आकाराच्या गोष्टींमध्ये असणारे अणू व रेणू एकाच प्रकारची आहेत. आपल्या शरीराची जडणघडण व पृथ्वीची जडणघडण तसेच सृष्टीतील सर्व वस्तूंची जडणघडण एकाच प्रकारच्या अणूंची आहे. तरीही या दृश्याच्या मागे एक तत्व आहे जे संपूर्ण सृष्टीला विविध नियमानुसार पण एका तत्वानुसार चालवत असते. आपल्या शरीरात जो आत्मा आहे तो मात्र वजा केला तर आपल्याला ज्या काही अनुभूती येतात त्या येणार नाहीत, आपल्यावर जे लोक

प्रेम करतात ते करणार नाहीत. आपलं जे काही स्वतंत्र अस्तित्व आहे ते या आत्म्यामुळेच आहे आणि ते वजा करता आपले काहीच अस्तित्व नाही. पण जसा आपल्यातील आत्मा आहे तसाच इतरातील आत्माही आहे आणि अशा प्रकारे तत्व पातळीवर आपण एकाच परब्रह्माचे अंश आहोत.

अध्यात्मिक माणसाने ही भावना क्षणोक्षण जपली पाहिजे आणि त्याच्या छोट्याछोट्या कृतींमधून हे दिसले पाहिजे. अध्यात्मिक जीवनासाठी फार मोठ्या साधन सामग्रीची गरज नसते पण डोळसपणा व सजगतेची गरज असते. अशा प्रकारचे जीवन जगण्यासाठी आपण आधी आपल्या अंतरंगात डोकावलं पाहिजे आणि नंतर बाह्य जगाशी संबंध ठेवताना त्या अंतरंगाचे व बाह्यजगाचे काय संबंध आहेत हे समजून घेऊन वागले पाहिजे तर ते एक उत्तम अध्यात्मिक जीवन बनण्याकडे टाकलेले पहिले पाऊल ठरेल.

## ।। जय जय रघुवीर समर्थ ।।

आजच्या सोशल मीडियाच्या युगात नेहमी अपडेट राहणे गरजेचे आहे. समर्थांच्या आशीर्वादाने मी समर्थ कार्याचा प्रचार प्रसार करत आहे. हे कार्य नवीन समाज माध्यमांद्वारेही करत आहे. तुमच्यापैकी अनेकांना माझे दैनंदिन विचार आणि समर्थांचे विचार व्हॉट्सअॅपवर प्राप्त करण्यात रस आहे. या नवीन माध्यमा द्वारे माझ्याशी कनेक्ट होण्यासाठी, आपण सर्व माझ्या WhatsApp चॅनेलमध्ये सामील होऊ शकता. या चॅनेलवर दररोज नवीन समर्थ विचार आणि माझे विचार पोस्ट करण्याचे माझे ध्येय आहे. तुम्ही दिलेल्या लिंकवर क्लिक करून चॅनल फॉलो करू शकता- https://whatsapp.com/channel/0029VaEpfzFFcow1KQqey03E

**स. भ. मोहनबुवा रामदासी**

(कार्यकारी विश्वस्त)

आनंदी-नारायण कृपा न्यास श्रीक्षेत्र खातगाव, ता. कर्जत जि. अहमदनगर. मो. : ९१४६८५५६९१

# गीता जयंती

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

गीता ही कल्याण करणारी ग्रंथरूपी देणगी मानवाला लाभलेली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग, भक्तियोग त्यात आहेत. गीता हा जगातील एकमेव ग्रंथ आहे ज्याची जयंती साजरी केली जाते. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी रोजी साजर्या होणाऱ्या गीता जयंतीनिमित्त.

मार्गशीर्ष शुद्ध एकादशी या दिवशी कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद्गीता सांगितली. गीतेचा या दिवशी जन्म झाला म्हणून मार्गशीर्ष शुद्ध एकादशी हा दिवस गीताजयंती म्हणून साजरा केला जातो. या एकादशीला मोक्षदा एकादशी असे नाव आहे आणि भगवद्गीता ही मोक्षदा आहे..

गीतारूपी अमृत श्रीकृष्ण भगवंतांनी अर्जुनाच्या निमित्ताने जगाला दिले असून जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्रत्येक विचार या गीतेत आहे म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष असून मार्गशीर्ष शुक्ल एकादशी हा भगवद् गीतेच्या जयंतीचा दिवस म्हणून साजरा होतो.

भगवद्गीता हा प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ आहे. यामध्ये भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला जीवनाबद्दल केलेला उपदेश लिहिलेला आहे. आजही गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेले उपदेश आपल्या

अनेक समस्यांना उत्तरे मिळवून देण्यास मदत करतात. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी या दिवशी गीता जयंती साजरी केली जाते.. त्याचप्रमाणे हा दिवस मोक्षदा एकादशी म्हणून देखील ओळखला जातो...

मार्गशीर्ष शुक्ल एकादशी ही मोहाचा क्षय करणारी आहे यामुळे या दिवसाला मोक्षदा एकादशी असे देखील म्हटले जाते.. या दिवसापासून मानवाच्या जीवनाला नवी दिशा देणाऱ्या गीतेचा उपदेश सुरू झाला त्यामुळे मानवी जीवनाला सत्कारणी लावण्यासाठी भगवद्गीतेमधील पाठ वाचले जातात...

भगवद्गीता हा ग्रंथ भगवंत श्रीकृष्णानी अर्जुनाला कुरुक्षेत्रावर कथन केला.. त्याकाळी प्रत्येक माणसासाठी त्यातील तत्त्वज्ञान जितके उपयुक्त आणि कल्याणकारी लाभदायक होते तेवढेच ते तेव्हाही होते व आजही आहे... भले संदर्भ बदललेले असतील. परंतू अखिल मानव जातीच्या कल्याणाचा पाया गीतेत तसाच्या तसा आहे.. त्याची जयंती साजरी करणे..तसेच त्याचे श्रवण– पठण आजही आणि भविष्यातही महत्त्वपूर्ण आणि साजेसे राहील यात शंकाच नाही..

सदासर्वकाळ गीता एक प्रेरणादायी ग्रंथ आहे.. माणसाला कल्याण मार्गाकडे नेणारा हा ग्रंथ..

खरे म्हणजे भगवंताने अखिल मानवजातीला संदेश दिला आहे...

कुरुक्षेत्रावर अर्जुनाला उपदेश करताना गीता सांगणे ही मोठी घटना असली तरी अर्जुन हा त्या घडीचा केवळ निमित्तमात्र आहे.. अर्जुनाला तर कुरुक्षेत्रावर फक्त कर्मयोग सांगण्याची गरज होती.. परंतू भगवंताने त्यासोबतच इतरही योग सांगून त्याचे उदात्तीकरण करण्याचे आणि ते विस्ताराने सांगण्याचे कारण मुळातच समस्त मानवापर्यंत ते पोहोचविणे हे होय..

गीता फक्त तत्त्वज्ञान सांगत असली तरी त्यात कर्मयोग (प्रॅक्टिकल) अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हा




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH

B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

LIC

STAR Health Insurance

कर्मयोग माणसाला विज्ञानाचे माहात्म्य सांगतो व एकीकडे विधात्यावर श्रद्धा ठेवण्याचे आवाहन गीतेत आहे तर दुसरीकडे विज्ञानवादी दृष्टिकोनाचा अंगीकार करायला शिकवला जातो असे सुरेख संतुलन सांगणारे तत्त्वज्ञान या गीतेत दिसते...

भारताबाहेरही गीतेचे अनेक भक्त असून जगातील अनेक भाषांत गीतेचे भाषांतरे झालेली आहेत. ..

भगवान श्रीकृष्णाने प्रथम सूर्याला गीता सांगितल्याचे पुराणात म्हटले आहे. माझ्यासाठी कर्मे करणारा, मीच ज्याचे अंतिम उद्दिष्ट आहे, माझा भक्त, आसक्तिरहित, प्राणिमात्रांबद्दल निर्वैर वृत्तीचा माझ्यापाशी येतो,' हा संपूर्ण गीताशास्त्राचा सारभूत अर्थ सांगणारा आदेश आहे...

गीता म्हणजे भारताच्या गौरवाची शान आहे....

गीता ही आयुष्यात वरची पातळी गाठण्याची पायरी आहे.

आत्मपरीक्षण, संयम, ध्यान आणि अर्थातच दया या सगळ्यांमुळे आयुष्य कसे समृद्ध होते याची शिकवण गीता देते. यामुळे एका विचारावरून दुसऱ्या विचाराकडे धावणारे चंचल मन शांत होते.

गीता तुम्हाला अत्युच्च उंचीवर पोहोचवू शकते. भावनांच्या कोलाहलाला शमवण्याचे सामर्थ्य गीतेत आहे... मनातील काहूर शांत करण्याची आणि निस्सीम मनशांती देण्याची शक्तीही गीतेत आहे.. कठीण परिस्थितीतही जीवनाला धैर्याने सामोरे जाण्यासाठीचा समतोल गीता देते.

स्वामी विवेकानंद शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत गेले होते तेव्हा त्यांच्याजवळील ग्रंथ त्यांना हिणवण्यासाठी सर्व ग्रंथांच्या खाली ठेवण्यात आला. इतर धर्मीयांनी आपले विचार व्यक्त केल्यावर सर्वात शेवटी विवेकानंद उभे राहिले आणि त्यांनी उपस्थित श्रोत्यांना उद्देशून बंधू आणि भगिनींनो असे म्हणत साऱ्या विश्वाशी नाते जोडले... त्यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. तो थांबल्यावर धर्मग्रंथांकडे अंगुलीनिर्देश करून स्वामीजी म्हणाले सर्व धर्मग्रंथांच्या खाली जो धर्मग्रंथ ठेवला आहे ती भगवद्गीता आहे.. तो ग्रंथ सर्वात खाली ठेवला आहे यावरून आपल्या लक्षात येईल की गीता सर्वधर्मग्रंथांचा पाया आहे.. जर पाया भक्कम असला तरच त्यावर इमारत उभी राहू शकते. स्वामीजींच्या या शब्दांनी प्रचंड टाळ्यांचा कडकडात तर झालाच पण परदेशात भारतीय संस्कृतीचा प्रचार- प्रसार ही झाला.. इतकचं नाही तर परदेशातील लोकही गीतामृत प्राशन करण्यासाठी भारतीय संस्कृतीचे पाईक झाले.

मानवी मनावर, जीवनावर, विचारांवर गीतेचा किती प्रभाव पडलेला आहे ते कळते.

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला गीताजयंती म्हणून सन्मानिताना तिला मोक्षदा म्हणजे मोक्ष प्राप्त करून देणारी म्हणून गौरविणे किती यथार्थ आणि उचित आहे नाही...?

## संस्कृत शिकणे-एक राष्ट्रीय गरज

**डॉ. मंजूषा कुलकर्णी** (मो. : ९०८२१६४५२६/९८२२८२९४९१)

'भारतस्य प्रतिष्ठेद्वे संस्कृतं संस्कृतिस्तया' असे म्हटले जाते. अर्थात् संस्कृत व संस्कृती ह्या दोन बाबी भारताच्या प्रतिष्ठा म्हणजे गौरव आहेत. कोणत्याही देशाची प्रतिष्ठा असलेल्या बाबी चिरकाळापर्यंत टिकवण्याची जबाबदारीही त्या देशाच्या नागरिकांचीच असते. अनेक वर्षांपासून भारतीयत्वाच्या खाणाखुणा अंगाखांद्यावर बाळगणारी ही संस्कृतभाषा अक्षर असून तिच्यातील ज्ञानविज्ञानपरंपराही अक्षय आहेत. हजारो वर्षांच्या समृद्धतेचा वारसा संस्कृत भाषेत दडलेला आहे म्हणूनच आजही जगाला या भाषेच्या सर्वांगसुंदर वैशिष्ट्याने मोहिनी घातलेली दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संस्कृत भाषेचे नुसते अभ्यासकच नव्हते तर तर त्यांनी संस्कृतभाशा ही भारताची राष्ट्रभाषा व्हावी म्हणून प्रयत्नदेखील केलेले होते. यासाठी त्यांच्याबरोबर श्री. प्रकाश, डॉ. सी. व्ही. रमण, डॉ. बाळकृष्ण केसरकर, कृष्णम्माचारी यांचाही समावेश होता. डॉ. आंबेडकरांनी 'अनुच्छेद ३१०' (पुनर्मांडणीनुसार अनुच्छेद ३४३) यात एक संघराज्याची शासकीय भाषा संस्कृत असावी अशी मागणी केलेली होती. संस्कृत भाषाविषयक त्यांचे प्रेम हे त्यांच्या समग्र साहित्यावरून तसेच संविधान सभेतील त्यांच्या गाजलेल्या भाषणांवरून लक्षात येते. थोर विचारवंत दत्तोपंत टेंगडींच्या 'सामाजिक क्रांतीची वाटचाल आणि बाबासाहेब या ग्रंथामधील परिशिष्टात त्यांनी बाबासाहेबांचे संस्कृतचे ज्ञान व तदनुषंगिक संदर्भ दिलेले आहेत. बाबासाहेब म्हणतात, 'मला संस्कृत भाषेचा अत्यंत अभिमान आहे. ती भाषा मला चांगली यावी अशी माझी तीव्र इच्छा आहे. आता स्वतःच्या मेहनतीने मी थोडेसे संस्कृत वाचू समजू शकतो. पण त्या भाषेत पारंगत व्हावे अशी माणी आंतरिक तळमळ आहे. तो सुदिन कधी उगवेल, तो खरा.'

यावरून डॉ. बाबासाहेबांच्या अंतःकरणात संस्कृतभाषेची असलेली आस्था लक्षात येईल. म्हणूनच त्यांनी संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी, असा प्रस्ताव डॉ. आंबेडकरांनी संविधान निर्मिती सभेच्या बैठकीत ठेवला होता. विविध प्रांतांतून आलेल्या निरनिराळ्या धर्मांच्या व्यक्तींचाही त्याला पाठिंबा होता. भारताला भाषिक अस्मितेच्या लढ्यांपासून मुक्त करणे, हा त्यांचा उद्देश होता. 'भाषा आधारित राज्यांमुळे नवीन राष्ट्रीयता निर्माण होण्याचा धोका आहे' असा सावधानतेचा इशारा त्यांनी 'थॉटस् ऑन लिंग्विस्टिक स्टेटस्' या ग्रंथात दिला होता. संस्कृतभाषा ही प्राचीनतम तर आहेच परंतु ती ज्ञानसमृद्ध भांडारयुक्त आहे हेही ते जाणत होते. 'एक देश एक भाषा' हा भारतीय एकात्मतेचा मंत्र संस्कृतमुळेच साध्य होऊ शकतो असे त्यांना वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी संस्कृतमध्ये संवादही साधलेला होता. पश्चिम बंगालचे खासदार पं. लक्ष्मीकांत मैत्र यांनीही डॉ. आंबेडकरांच्या 'संस्कृत ही राष्ट्रभाषा व्हावी' या विचाराला पाठिंबा दिलेला होता. पं. मैत्र यांना डॉ. आंबेडकरांच्या संस्कृतभाषेच्या ज्ञानाविषयी खात्री करून घ्यायची होती म्हणून पं. मैत्रांनी आपल्या काही शंका संस्कृतमधूनच डॉ. आंबेडकरांना विचारल्या आणि डॉ. आंबेडकरांनीही सर्व उत्तरे संस्कृतमधूनच दिली. हा उभयतांचा संवाद ऐकून घटनासमितीच्या बैठकीतील सर्व सदस्य आश्चर्यचकीत झाले होते. ही बातमी तत्कालीन प्रमुख वृत्तपत्रांमध्येही प्रकाशित झालेली होती. (संदर्भ पहा : महाराष्ट्र बोर्ड इ. १०वी संस्कृत पाठ्यपुस्तक पाठ 'संस्कृत स्थानातील डॉ. आंबेडकरांचे योगदान')

भारतीय संस्कृती, संस्कार, संतोष, समाधान, सागरालय सखोल ज्ञानपरंपरा, वैचारिक व तत्त्वज्ञानात्मक श्रेष्ठता, नीतिमूल्ये, अखिल विश्व कल्याणकामना सिद्धी, ज्ञान-विज्ञान शाखा, भाषिक मौलिकता, शब्दसौष्ठव, पुरुषार्थ सिद्धी, इहपरलोकातील जीवनसौष्ठव, जगण्याची शांतमय




परिभाषा, सर्वांगीण परिपूर्ण सुखद ??? अशी अनेक ध्येये संस्कृतभाषेच्या अध्ययनामुळे पूर्ण होऊन मानवी जीवन आदर्श व यथार्थ होऊ शकते म्हणूनच संस्कृत भाषेचे अध्ययन ही राष्ट्रीय गरज आहे.

नुकतीच भारताची चांद्रयान ३ ही मोहीम जी सफल झाली, भारत हा जगातील चंद्राच्या दक्षिण टोकावर पाऊल टाकणारा, यंत्राच्या साफल्याने ज्ञानश्रेष्ठत्व सिद्ध करणारा एकमेव देश ठरला. त्यातही संस्कृत भाषेतील संपूर्ण या ज्ञान-विज्ञान संस्कृतीसारख्या मौल्यवान घटकांचे अध्ययन नितांत आवश्यक आहे. मानवी सभ्यतेच्या प्राचीनतम इतिहासाची एकमेव परिचायक अशी ही संस्कृत भाषा आहे, जी आधुनिक भाषारूपातही सार्थक ठरते.

संस्कृत ही संस्कारांची भाषा आहे. तिचे शब्दभांडार अतिविशाल असून तिची शब्दसृजनक्षमता कधीही न संपणारी आहे. तिचे व्याकरण अतिशय सुसंबद्ध, तर्कशुद्ध आहे. संस्कृतभाषेइतके शुद्ध व्याकरण जगातील खचितच कुठल्या भाषेचे असेल. ही या जगातील प्राचीनतम भाषा असून ही अधिकांश भाषांची जननीदेखील आहे. केवळ भारतासाठी नव्हे तर अखिल विश्वाच्या विकासासाठी एखाद्या नवजात शिशुलाही मातेचे स्तन्य जसे वरदान ठरते तसेच संस्कृतभाषा हे वरदान ठरेल. कारण ही संसारातील सर्वात वैज्ञानिक व लवचिक भाषा आहे. हिच्या बोलण्यामुळे मानवी जिव्हेच्या सर्वांगाचा विकास होतो. मुखातील सर्व उच्चारणकेंद्रे उद्दीपित होतात. भाषाध्ययनाचा परमोच्च बिंदू साधल्या जाऊन मानवी मस्तिष्कातील सर्व चेतातंतू प्रेरित होतात. म्हणूनच मानवी विकासही झपाट्याने होऊ शकतो. तीव्र बुद्धिमत्ता, निकोप भावनिक विकास तसेच आध्यात्मिक उंची गाठण्यासही संस्कृतभाषा सर्वतोपरी सहाय्यक ठरते.

मानवी विकासाच्या ऐतिहासिक टप्प्यांना समजून घेण्यासाठी प्राचीनतम भाषा असल्याने संस्कृतातील प्राचीन ग्रंथांच्या माध्यमाने तत्कालीन समाज व प्रगत सभ्यता यांचे ज्ञान होऊ शकते.

संस्कृतभाषा आधुनिक तंत्रज्ञानात्मक युगातही वरदान ठरू शकते. जगभरातील विद्वानांच्या मते संस्कृत ही भाषा संगणकासाठी सर्वात तांत्रिक व शास्त्रशुद्ध भाषा ठरत आहे. संगणकीय भाषांना ती सटीक बसू शकते. या भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे संस्कृतभाषेतील वाक्यरचनेचा क्रम कसाही बदलला तरी अर्थात बदल होत नाही. म्हणजेच कर्ता, क्रम, क्रियापद यांचा क्रम ठेवला तरी अर्थाला आपत्ती येत नाही. असे वैशिष्ट्य जगातील अन्य कोणत्याच भाषेत आढळत नाही. म्हणूनच 'नासा' या अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेने ही संस्कृतची विशेषता सखोलतेने जाणून तेथील पूर्वप्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांना संस्कृत अध्यापनाची सोय केली गेली आहे.

या भाषेतील प्राचीनतम उपलब्ध साहित्य म्हणजे 'वेद' असून वैदिक साहित्यापासून असंख्य ग्रंथ या भाषेत आढळतात. ही भाषा सार्वकालिक लोकप्रिय राहिलेली आहे. वेदांची वैदिक संस्कृत ही वैज्ञानिक भाषा असून निरुक्त व्याकरणज्ञानाशिवाय त्यांचे यथार्थ ज्ञान होणे कठीण आहे. पाणिनीसारख्या व्याकरणकाराने या भाषेच्या लौकिक रूपाला व्याकरणाची सुसंबद्ध जी चौकट दिली आहे, ती युगातही कोणत्याच भाषेत आढळत नाही.

स्वतःच अतिशय वैज्ञानिक असलेल्या या भाषेत आधुनिक विज्ञानाच्या सर्व शाखांचे मूळ तर आढळतेच, परंतु आधुनिक विज्ञानाच्या पलीकडील विज्ञानशाखांची उत्पत्तीदेखील या भाषेतून दिसून येते. प्राचीन भारतीय दर्शन, ध्वन्यात्मक भाषाविज्ञान, व्याकरण, खगोलविज्ञान, अर्थशास्त्र, सांख्यसिद्धांततर्क, जीवनविज्ञान, आयुर्वेद, ज्योतिष, संगीत, साहित्य अशा विभिन्न मानवी कल्याणकारी क्षेत्रात संस्कृतभाषेने जे यश प्रस्थापित केलेले आहे ते अन्य कोणत्याच भाषेत नाही. प्राचीन भूमिती, बीजगणित, वाद्ययंत्रे, धातुशास्त्र, वास्तूशास्त्र, मूर्तिविज्ञान, जन्मव्यवस्थापन, वेद, वेदांग, भारतीय दर्शनशास्त्रे, छंद, व्याकरण, भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी, विमानशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, कृषिविज्ञान, जलसंधारण, भूगर्भशास्त्र, पर्यावरणशास्त्र, सौंदर्यशास्त्र, कला व संस्कृती, योग, भूगोल, स्थापत्यशास्त्र, राज्यशास्त्र, युद्धशास्त्र, शिक्षाशास्त्र, न्यायशास्त्र, हस्तलेखन विज्ञान, संगणक यांसारखे नानाविध शास्त्रग्रंथ व शास्त्रज्ञ संस्कृतात उपलब्ध आहेत.

या प्राचीन शास्त्रज्ञांना, वैज्ञानिकांना ऋषी संबोधले जात असे. त्यात कपिलमुनी, धन्वंतरी, आर्यभट्ट,

विश्वकर्मा, सुश्रुत, वागभट, नागार्जुन, चरक, भास्कराचार्य, वराहमिहिर, कणाद, घटाशर अशा अनेक दिग्गजांचा समावेश आहे. जगाला गणनाशास्त्र व 'शून्य'' ही संकल्पनाही संस्कृतभाषेतेच दिलेली आहे.

संस्कृत भाषेतील हस्तलिखितांचा खजिनाही तितकाच मोठा आहे. ४५ लाखांपेक्षा अधिक हस्तलिखिते संकलित झालेली असून ५० लाखांहून अधिक हस्तलिखिते आजही भारतातील घराघरात गावागावात अध्ययनाच्या प्रतिक्षेत आहेत. ज्यातून ज्ञानाचे एक अथांग दालन जगासाठी खुले होऊ शकते.

संस्कृतभाषेच्या अध्ययनाने मानवी मेंदूच्या क्रियाशीलतेवर अतिशय सकारात्मक परिणाम होत असल्याचे डॉ. फ्रेड ट्रॅव्हिस, विभागप्रमुख, मज्जासंस्थीय भौतिकविज्ञान, महर्षी विद्यापीठ यांनी शरीरविज्ञान शास्त्रविषयक संस्कृताध्ययनाने होणारे परिणाम हे ध्यानप्रक्रियेसारखेच ठरत असल्याचे तसेच संस्कृत पठनाने, पाठांतराने मानवी मस्तिष्कावर सकारात्मक शरीर विज्ञानात्मक परिणाम दिसून येत असल्याचे म्हटले आहे.

जेव्हा पाश्चात्त्य संस्कृती रानीति, समाज, कला, इतिहास, भूगोल तसेच विज्ञानवादी विषयांची पहिली पायरी विकसित करत होते. तेव्हा भारतीय सभ्यता व संस्कृती उपनिषदांचया द्वारे 'ब्रहमविद्यात्मक ज्ञानाला सर्व विष्यांचे आधारीभूत म्हणून स्थापित करून बसली होती. डॉ. राधाकृष्णन् उल्लेखतात की, कौटिल्याच्या मते दर्शनशास्त्र हे अन्य सर्व विषयांसाठी प्रदीप ठरत असते. हेच सर्व कार्यांचे साधन व कर्तव्यकर्मांचे मार्गदर्शक ठरते' हे दर्शनिक चिंतन भारतात तत्त्वमीमांसा, ज्ञानमीमांसा व नीतिमीमांसात्मक आहे. याचे तीन लक्ष्य म्हणजे सत्, प्रकाश व अमरत्व निर्दिज आहेत. म्हणूनच 'सा विद्या या विमुक्तये' तेच खरे ज्ञान जो मुक्तिमार्ग प्रशस्त ठरेल. मनुष्यजीवनाच्या संपूर्ण ज्ञानालाच विद्या म्हटले आहे. त्या विद्या पराविद्या व अपराविद्या म्हटल्या जातात. 'असतो ना सद्गमय' यातून सत्कडे मानवाचा प्रवास अपेक्षित आहे. जो अंधाराकडून तेजाकडे चालतो. या प्रवासाने परमानंद प्राप्ती होते. तसेच या 'सत्'ला शोधण्याचा ज्ञानप्रक्रियेचे सुंदर विवेचन हेच भारतीय वाङ्मयाचे सौंदर्यही आहे.

ज्ञान, विज्ञान व दर्शनशास्त्रात मानवकल्याण कामनाच निहित आहे. लोकमंगल हितैषी कामना या या सर्वांचा गाभा आहे. गीत, संगीत,नाट्यादी कलांनी मानवी मनाच्या आल्हादक विकास लागभलेला आहे. या कलांचा उगम वेदकाळातूनच दिसून येतो. पंचकमायज्ञ, चार पुरुषार्थ यांसारख्या अनेक संकल्पना मानव व सजीवांच्या हितास्तव संस्कृतभाषेत मांडलेल्या आहेत.

पृथ्वीला माता म्हणत 'माना भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' असे अथर्व वेदातील पृथ्वीसूक्तावरून सविस्तृत मातृभूमिसंकल्पनेच्या वाचनातून मानवी मनाची प्रगत झाल्या लक्षात येऊ शकते. सारी पृथ्वीच माता, सारी वसुधाच कुटुंब 'वसुधैव कुटुम्बकम्' ही ब्रीद वाक्ये देणारी संस्कृत भाषा भारताला पुन्हा विश्वगुरू पदावर विराजमान करण्यास निश्चितच सामर्थ्यशालिन आहे. म्हणूनच आज संस्कृत शिकणे ही राष्ट्रीय गरज ठरलेली आहे, जी आपल्या राष्ट्राला जगभरात पुनः प्रतिष्ठित करेल. चला तर मग संस्कृत शिकू या, भारत जाणू या, विश्वाला आपलेसे करू या!


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई

समाजातील मुंबई बाहेरुन येणाऱ्या ज्ञाती बांधवांसाठी दादर येथे मध्यवर्ती भागात निवासाची (अल्पदरात) उत्तम सोय करण्यात आली आहे. गरजू ज्ञाती बांधवांनी याचा लाभ घ्यावा. * दादर स्टेशनजवळ * स्थानासाठी गरम पाण्याची सोय * प्रशस्थ हवेशीर रुम्स. अल्पकाळासाठी मुंबईत येऊ इच्छिणाऱ्या ज्ञाती बांधवांना कार्यालयाशी संपर्क करून पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. कार्यालयीन वेळेतच इच्छुकांनी चौकशीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **संस्थेचा पत्ता :** अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहीम, मुंबई ४०००१६. दूरध्वनी : ०२२-२४३०२२७३ / २४३०७५७३

# SHRI YASH TOURS

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS

E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| मदुराई, कोडाई केनॉल, तंजावर, रामेश्वर | जाने. १६ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान |
| कलकत्ता, शांती निकेतन व सुंदरबन | जाने. २५ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २५,००० + विमान |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | फेब्रु. ९ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू.१३,००० + रेल्वे |
| इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, मांडू | फेब्रु. १६ — ४ रात्र<br>खर्च प्र.रू. १९,००० + रेल्वे |
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर,जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | फेब्रु. २० — ६ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३१,५०० + विमान |
| म्हैसुर, उटी | मार्च ११ — ५ रात्र<br>खर्च प्र. रू.२५,००० + विमान |
| काश्मीर - श्रीनगर, पहलगाग, सोनमार्ग, - गुलमर्ग व कारगील | मार्च २६ — ७ रात्र<br>एप्रिल २, ९, १७,<br>खर्च प्र. रू. ३३,०००+ विमान |
| दार्जिलींग, गंगटोक, पेलिंग | एप्रिल २७ — ६ रात्र<br>खर्च प्र. रू. ३३,००० + विमान |

सुचना - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing ) , ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व रात्रीचे भोजन, स्थळदर्शन व स्थळ मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.
- जी.एस.टी. टॅक्स स्वतंत्र द्यावा लागेल.

## ऋग्वेद भूषण



ज्ञातीचे भूषण असलेले श्री. रविंद्र गजानन अवटी यांच्याविषयी जाणून घेवूया. श्री. रविंद्र गजानन अवटी यांचा जन्म ज्ञानेश्वरकालीन श्री. पांडुरंगाचे मंदिर असलेले श्रद्धास्थान मु. पो. म्हाळुंजे, तालुका श्रीरामपुर, जिल्हा अहमदनगर येथे झाला. जिल्हा परिषदेच्या शाळेत सातवी पर्यंतचे शिक्षण म्हाळुंजे येथेच झाले. आठवी व त्यापुढील शिक्षणासाठी दादर मुंबई येथील समर्थ विद्यालय येथे प्रवेश घेतला. मॅट्रीक पास झाल्यावर अकरावीसाठी किर्ती महाविद्यालयात शास्त्र शाखेत प्रवेश घेतला. शास्त्र शाखेकडे कल नसल्याने बारावी पासून रुपारेल कॉलेज मुंबई येथील कला शाखेत पुढील शिक्षण झाले. एम.ए., एम.फिल. या पदवीनंतर एल.एल.बी. चे शिक्षण चालु असतानाच शिपिंग मॅनेजमेंट कंपनीत नोकरी सुरु केली. २२.०३.१९७८ रोजी डोंबिवलीत वास्तव्य. डोंबिवली येथे कला, क्रिडा मंडळाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. याच वेळी श्री. माधवराव गडकरी लोकसत्ताचे संपादक यांची भेट झाली आणि नवशक्तिचे उपसंपादक म्हणून त्यापुढे महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता व नवशक्ति आदि वर्तमानपत्रात उल्लेखनीय कामगिरी आणि सातत्याने लेखन केले आहे. यानंतर चौगुले ग्रुपवर जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. हे करत असतानाच १९९४ मध्ये मुंबईतील बेस्टमध्ये उपव्यवस्थापक म्हणून नियुक्ती. अनेक विविध नवीन संकल्पना राबवित बेस्टच्या व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर १९९६ मध्ये फिनोलॅक्स या कंपनीमध्ये जनसंपर्क अधिकारी पदी नियुक्ती झाली. नोकरीत मन रमेना यासाठी १९९८ साली स्वतःचा व्यवसाय सुरु केला. याच दरम्यान उद्योगपती धिरुबाई अंबानी यांनी चर्चेस बोलाविले आणि श्री. धिरुबाई अंबानी यांच्या रिलायन्स कंपनीत व्हाईस प्रेसिडेंट म्हणून आठ वर्षे कार्य केले. कार्पोरेट क्षेत्रातील ३५ वर्षाचा अनुभव असलेले श्री. आवटी यांनी रिलायन्सच्या ४जी प्रोजेक्टमध्ये मानद अध्यक्ष (अशोसिएट प्रेसिडेंट) म्हणून कार्य केले. हे करीत असताना जवळपास ३५० मराठी लोकांना नोकऱ्या व रोजगार उपलब्ध करून दिला. महाराष्ट्र कला प्रतिष्ठान, समर्थ कला प्रतिष्ठान, कोकण मराठी साहित्य परिषद, अनिल मोहीते संगीत अकॅडमी, कवी ग्रेस प्रतिष्ठान, दादर-माटुंगा कल्चरल सेंटर, जागतिक मराठी परिषद, पंडीत वसंतराव देशपांडे प्रतिषठान आदि संस्थेवर त्यांनी पदाधिकारी म्हणून कार्य केले आहे. न्यायदेवता, शुभमंगल सावधान आदि चित्रपटात अभिनय देखील केला आहे. मार्ग सुखाचा या सुभाष भेंडे लिखित नाटकाचे दिग्दर्शनही त्यांनी केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बौद्धिक प्रमुख तसेच भारतीय जनता युवा मोर्चा कल्याण-डोंबिवली यांचे अध्यक्ष पद देखील त्यांनी भूषविले आहे. अनेकांना आरोग्य विषयक मदत, सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असे. तीन हातांनी मदत केली पाहीजे असे त्यांच्या मातोश्री म्हणायच्या. त्याच उक्तीनी त्यांनी आजपर्यंत अनेक विविध सामाजिक कार्ये त्यांनी केली आहेत. ललित लेखन आणि लेखनाची आवड असलेली श्री. आवटी यांचा अलगद हा काव्यसंग्रह तत्कालीन मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. अनेक साहित्तीकांशी थेट संपर्क असलेल्या श्री. आवटी यांच्या डोंबिवली येथील घरी श्री. पु. ल. देशपांडे येवून गेल्याची नोंद आहे. मंगेश पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, कवि ग्रेस यांच्याशी त्यांचे नाते जवळकीचे होते. संपुर्ण आयुष्य समाजासाठी वाहीलेले तसेच प्रेरणादायी व्यक्तिमत्व, लेखक, साहित्य या क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय अशीच आहे. श्री. आवटी यांनी अनेक चित्रपटासाठी गाणी सुद्धा लिहिली आहेत. साहीत्य क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीबद्दल गदीमा पुरस्कार, जगदीश खेबुडकर पुरस्कार, अनंत काणेकर पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, शहा फाउंडेशन पुरस्कार आदि पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. नुकतेच प्रकल्प व्यवस्थापनाचे तंत्र, उाहूत आणि जनसंवाद या तीन पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मुंबई येथे दि. १८ नोव्हेंबर २०२३ रोजी मा. शालेय शिक्षण मंत्री श्री. दिपक केसरकर यांच्या शुभहस्ते आणि श्री. सुरेश खरे, श्री. विजय कोवळेकर, श्री. प्रविण दवणे, श्री. निलकंठ श्रीखंडे, श्री. श्रीकांत बोजेवार आणि श्री. विठ्ठल कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कर्तुत्वाने ओतप्रोत भरलेले आयुष्य जगणारे श्री. रविंद्र गजानन अवटी यांचा आम्हाला अभिमान आहे.

**शब्दांकन : श्री. मिलिंद सरदेशमुख**

*With*
*Best*
*Compliments*
*From*



S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

*Best Wishes From*

Reg. No. AR3/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH